# जलजीवन मिशन योजनेत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कारवाई कधी होणार?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २४१ ■ मंगळवार दि.२० मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 241 ■ Tuesday Dt.20 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4




# माळेवाडी (सुलतानपूर) येथील नागरिकांची पाण्यासाठी भटकंती ; बीड जिल्ह्यात जलजीवनमध्ये १८०० कोटीचा घोटाळा

## जलजीवन मिशन योजना नावालाच ; बोगस कामे दाखवून ऊचलले कोट्यावधी रुपये ?

**संबंधित गुत्तेदाराची चौकशी करुन कारवाई झाली पाहिजे, गावात ना नळ कनेक्शन ना प्यायला पाणी?**

**कामाची तक्रार केली म्हणून गावातील लोकांवर दबाव टाकून केले गप्प?**

**४-५ कोटी रुपयांची योजना फक्त बीलं ऊचलण्या पुरतीच का?**

**जिल्हा परिषद सीओ जीवने साहेब आपणच आता संबंधित गुत्तेदारांची चौकशी करुन कारवाई करा**

माजलगाव । प्रतिनिधी
तालुक्यातील माळेवाडी (सुलतानपूर) येथील नागरिकांची पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे. कारण येथे राबवली जाणारी योजना ही फक्त नावालाच राबवली आहे का? जल जीवन मिशन योजनेअंतर्गत कोट्यावधी रुपये खर्च करूनही नागरिकांच्या घशाला कोरडच का आहे. प्रत्येकाची तहान भागावी, पाणी टंचाई होऊ नये, पाण्याचा प्रश्न गंभीर आहे हे पाहता शासनाने जलजीवन मिशन ही कोट्यवधी रुपयांची योजना आणली व ती राबवली देखील पण फक्त कागदोपत्रीच, या योजनेचा लोकांना कुठेही फायदा होताना दिसत नाही. यामध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार होताना दिसत आहे या मध्ये काही भ्रष्ट अधिकारी पण सामील आहेत त्यामुळे या योजनेचे काम ईस्टीमेट प्रमाणे न करता बोगस निकृष्ट दर्जाचे झालेले आहेत.
या योजनेत झालेल्या भ्रष्टाचाराच्या अनेक लोकांनी तक्रारी पण केलेल्या आहेत पण यामध्ये संबंधित गुत्तेदारांकडून अधिकाऱ्यांसोबत आर्थिक तडजोड झाल्यामुळे या तक्रारींकडे कानाडोळा केला जातोय का? असा प्रश्न उपस्थित होताना दिसत आहे.
माळेवाडी (सुलतानपूर ) येथील जलजीवन मिशन अंतर्गत चालू असलेल्या योजनेत लाखो रूपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप येथील गावकऱ्यांनी केला आहे. या गावातील जल जीवन योजनेचे काम हे मागील दोन वर्षापासून कासव गतीने सुरू असून आतापर्यंत पूर्ण झालेले नाही. यामुळे येथील नागरिकांना पाण्यासाठी वनवन भटकावे लागत आहे पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. तरीही येथील ग्रामपंचायतला जाग येत नाही. कोट्यवधी रुपये खर्च करून शासनाने हि योजना येथे राबवली पण याचा फायदा ग्रामस्थांना कमी आणि अधिकारी व गुत्तेदार यांनाच होताना दिसत आहे.
जल जीवन मिशन चे काम बोगस रित्या करून बीलं उचलण्यात आलेले आहेत.
हे काम इस्टिमेट प्रमाणे केलेले नसून या कामांमध्ये लाखो रूपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे या कामाची तात्काळ सखोल चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे. कारवाई न झाल्यास गावकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. जलजीवन मिशन योजनेत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करणार कारवाई कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. तसेच जनजीवन मिशन योजना फक्त नावालाच आणि बोगस कामे दाखवून कोट्यावधी रुपयाची बिल उचलले आहेत. याप्रकरणी संबंधित गुत्तेदाराची चौकशी करून कारवाई होणे गरजेचे आहे. तसेच कामाची तक्रार केली म्हणून गावातील लोकांवर तबावर टाकून गप्प केले असल्याचे देखील बोलले जात आहे.
याप्रकरणी जिल्हा परिषद शिवचिवणे साहेब यांनीच आता संबंधित गुत्तेदाराची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी होत आहे.



# छगन भुजबळ यांनी घेतली मंत्रीपदाची शपथ

मुंबई । प्रतिनिधी
राज्यातील ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी राजभवनात मंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मंगळवारी सकाळी १० वाजता हा शपथविधी पार पडला.
धनंजय मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या जागी भुजबळांना मंत्रीपद देण्यात आलं आहे. त्यामुळं मुंडेंकडं असलेलं अन्न व नागरी पुरवठा खातच भुजबळांना देखील देण्यात येईल अशी चर्चा आहे. भुजबळांच्या मंत्रीपदानंतर आता नाशिक जिल्ह्याकडं चार मंत्रीपदं आली आहेत. यामध्ये दादा भुसे (शालेय शिक्षण), नरहरी झिरवळ (अन्न आणि औषध), माणिकराव कोकाटे (कृषी) आणि छगन भुजबळ यांना मंत्रीपदं मिळाली आहेत.
दरम्यान, भुजबळांना अद्याप अधिकृतरित्या खातं जाहीर झालेलं नसलं तरी मुख्यमंत्री जे खातं देतील ते आपण स्विकारु अशी प्रतिक्रिया मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर छगन भुजबळ यांनी दिली आहे. पण यापूर्वी भुजबळांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्रीपद चांगल्याप्रकारे भूषवल्यानं त्यांच्याकडं हेच मंत्रीपद येण्याची शक्यता आहे.

## आम्हाला काहीच फरक पडत नाही : मनोज जरांगे पाटील

छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली किंवा नाही घेतली हा त्यांचा पक्षांतर्गत प्रश्न आहे. छगन भुजबळ मंत्री झाले याचा आम्हाला काहीच फरक पडत नाही. अजित पवार जातीयवादी लोकं पोसायचं काम करत आहेत, असं मनोज जरांगे म्हणाले. तसेच अजित पवार प्रचंड मोठी चूक करत आहेत. याच्या परिणामाला त्यांना सामोरे जावं लागेल, असा थेट इशारा देखील मनोज जरांगे यांनी दिला.

# जातेगावात रात्रीतून उभारला छत्रपतींचा अश्वारुढ पुतळा

## ग्रामसेवकाच्या तक्रारीवरून १३ जणांवर गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी
जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून रात्रीतून अचानक महापुरुषांचे पुतळे उभे करण्याचे सत्र सुरू आहे. बीडमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारल्यानंतर गेवराईच्या जातेगावात छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारल्याचे समोर आले आहे. विनापरवाना पुतळा उभारल्याप्रकरणी १३ जणांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
गेवराई तालुक्यातील जातेगाव येथे ग्रामपंचायतीच्या बाजूला बाजारतळ परिसरात १८ मे रोजी रात्री काही तरुण, महिलांनी एकत्र येऊन लोखंडी चबुतऱ्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभा केला. शासनाची अथवा जिल्हाधिकाऱ्यांची कोणतीही परवानगी न घेता हा पुतळा उभा करण्यात आला होता. याप्रकरणी ग्रामसेवक मयूरी कचरे यांनी तलवाडा पोलिसांत तक्रार दिली. यावरून शीतल धोंडरे, रुद्रा घोलप, अण्णासाहेब चव्हाण, दीपक बनसोडे, गणेश ऊर्फ अभय पांढरे, विशाल पांढरे, अजय चव्हाण, सुरेश पांढरे, अशोक राऊत, रामेश्वर चव्हाण, राधेश्याम लेंडाळ, गोविंद चव्हाण, नामेदव चव्हाण व इतरांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला.

## नाल्याही तुडुंब तर सर्वत्र कचऱ्याचे ढीग

# धारूर शहरात स्वच्छतेचे तीन तेरा ; नगरपरिषदेचा भोंगळ कारभार

धारूर । प्रतिनिधी
मागच्या काही दिवसापासून किल्ले धारूर शहरात स्वच्छतेचे तीन तेरा वाजलेले पाहायला मिळत आहे. शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग तर नाल्या तुडुंब भरल्याने धारूर नगरपरिषदेच्या भोंगळ कारभाराने शहरातल्या नागरिकांसमोर रोगराईला निमंत्रणाचे दिन तर राज्य सरकारच्या व केंद्र सरकारच्या स्वच्छते बाबतीत अनेक योजना असल्या तरी धारूर नगरपरिषद स्वच्छतेच्या नावे त्याच योजनांना पाण्यात घालण्याच काम करताना दिसत आहे.
मागच्या काही दिवसापासून किल्ले धारूर नगरपरिषद प्रशासन स्वच्छतेच्या बाबतीत दुर्लक्ष करत झोपेच सोंग घेऊन शहरातल्या नागरिकांना घाणींच्या लोटासोबत सामना करण्यास भाग पडत आहे.

▶ पान २ वर



# कोठी येथे अज्ञात व्यक्तीने सोलरच्या पाट्या फोडल्या

केज । प्रतिनिधी



केज तालुक्यातील कोठी या गावी शेतकरी श्री.किसन चंदुबा डोंगरे यांच्या शेतामध्ये सर्वे नंबर ५० येथे विहीर असून विहिरीवर प्रधानमंत्री कुसुम योजने अंतर्गत आर्ज क्रमांक एम. एस. २३०८१३०४२ अन्वय सौर कृषी पंपासाठी सोलर प्लेट बसवण्यात आल्या होत्या.
दिनांक ०४/०५/२०२५ रोजी सदरील शेतकरी आठ वाजता घरी आले व दिनांक ०५/०५/२०२५ रोजी सकाळी ७ वाजता शेतात गेले असता अज्ञात व्यक्तीने शेतात जाऊन विहिरीवरील सोलर पंपाच्या ज्या पाट्या बसवण्यात आल्या होत्या. त्याच्यावर दगडफेक करून पाट्या फोडून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान करण्यात आले आहे. श्री.किसन चंदुबा डोंगरे यांच्या फिर्यादीवरून केज पोलीस स्टेशन येथे अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पो.ह. आघाव हे करत आहेत.

# आष्टी तालुक्यात सख्या चुलत्यानेच केला पुतणीवर अत्याचार

## आरोपीच्या नैसर्गीक मृत्युपर्यंत आजीवन कारावासाची सुनावली शिक्षा

बीड । प्रतिनिधी
पिडीत अल्पवयीन मुलीवर (पुतणीवर) बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आष्टी तालुक्यातील रहिवासी असलेला आरोपीस अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश –१ बीड मा. एस. आर पाटील मॅडम यांनी कलम ३७६ (२) (१), ३७६ (२) (प),३७६ (३) भादवी व कलम ६ बाल लैंगीक अत्याचार: प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये दोषी ठरवुन कलम ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये आरोपीच्या नैसर्गिक मृत्युपर्यंत आजन्म कारावास व २५,०००/– रूपये दंड तसेच कलम ५०६ भादवी अन्वये ६ महिने साधा कारावास व ५००/– दंड व दंड न भरल्यास १५ दिवसांचा साध्या



कारावासाची शिक्षा सुनावली आहे.
प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, ऑगस्ट २०२३ मध्ये पिडीतेच्या पोटदुखीच्या आजारावरून डॉक्टराकडे तपासणीसाठी घेउन गेल्यानंतर संबंधीत डॉक्टरांनी पिडीतेस पुढील तपासणीसाठी अहिल्यानगर (अहमदनगर) येथील तज्ञ डॉक्टराकडे पाठविले असता तज्ञ डॉक्टरांच्या तपासणी मधे पिडीता हि ७ महिन्याची गरोदर असल्याचे निर्देशनास आले

▶ पान २ वर

# आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल करुन जातीय रंग देणाऱ्यांवर होणार कठोर कारवाई!

बीड । प्रतिनिधी
बीड जिल्ह्यातील सामाजीक सलोखा आबाधीत राखण्याची जबाबदारी प्रशासना बरोबरच जिल्ह्यातील नागरीकांचीही आहे. सध्याच्या सोशल मिडीयाच्या युगात सोशल मिडीयाचा वापर हा प्रत्येकाने जबाबदारीने करणे अपेक्षीत आहे. असे निदर्शनास आले आहे की, बीड जिल्ह्यात काही नागरीकांकडून आक्षेपार्ह व्हीडीओ किवा फोटो सोशल मिडीयावर पोस्ट केले जात आहेत. सदर आक्षेपार्ह व्हीडीओ किंवा फोटोची खात्री न करता काही समाज कंटकां कडून ते व्हायरल करुन त्याला जातीय रंग देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ज्यामुळे बीड जिल्ह्यातील सामाजीक सलोख्याला तडा जात आहे. सोशल मिडीयावर पोस्ट होणाऱ्या आक्षेपार्ह पोस्टची प्रथम खात्री होणे गरजेचे आहे. तसेच अशा आक्षेपार्ह पोस्ट तात्काळ व्हायरल न करता त्याबाबत लगतच्या पोलीस स्टेशनला जाऊन नागरीकांनी त्या व्हायरल व्हीडीओ/फोटोची खात्री त्याची कायदेशीर सत्यता पडताळून कायदेशीर कारवाई करणे गरजेचे आहे.



बीड जिल्ह्यात सोशल मिडीयावर व्हायरल होणाऱ्या आक्षेपार्ह व्हीडीओ/ फोटो/पोस्ट वर सायबर पोलीस

▶ पान २ वर

# निष्क्रिय पालकमंत्री अजितदादांचा राजीनामा लोकशाही मार्गाने निदर्शने करत मागणाऱ्या आंदोलनकर्त्यांना पोलिस प्रशासनाने उचलले

# अजितदादांची टगेगिरी सहन करणार नाही : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

मी एकेकाला सुतासारखं सरळ करीन अशा वल्गना करणा-या पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या बीड जिल्ह्यात टोळक्यांनी मारहाण करत व्हिडिओ प्रसारित करून दहशत निर्माण केली असुन कायदा व सुव्यवस्था बिघडली असुन ती राखण्यास पोलिस प्रशासन असमर्थ ठरत आहे.पोलिस प्रशासनाचा धाक राहिलेला नाही आणि पालकमंत्री अजितदादा यांचे पोलिस खात्यावर नियंत्रण नाही नसल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यास असमर्थ, पवनचक्की कंपन्यांकडून महसूल व पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने दडपशाही व खोटे खंडणीचे गुन्हे दाखल असताना शेतकऱ्यांना न्याय देण्यास असमर्थ उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री महाराष्ट्र राज्य असुन तिजोरीच्या चाव्या हातात असताना बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना शासकीय मदत वेळेवर देण्यासाठी असमर्थ तसेच बीड शहरातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी महावितरणचे थकीत ३३ कोटी रुपये वीजबिल नियोजन अथवा वित्त विभागातुन देण्यास असमर्थ तसेच बीड जिल्ह्यातील जलजीवन योजनेंतर्गत कामांसाठी २५० कोटी निधीची आवश्यकता असताना केवळ १४ कोटी रुपये मंजूर करून ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यास असमर्थ बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी बीडच्या




पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, पांडुरंग हराळे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, आसाराम माने यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने निदर्शने करत असताना त्यांना पोलिस प्रशासनाने आंदोलन करत असताना पकडून पोलिसांच्या गाडीत टाकून शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये नेले आणि २ अडीच घंटे शिवाजीनगर पोलिस स्टेशनला बसवुन ठेऊन अजितदादा बीडमधून गेल्यानंतरच सोडून दिले.

**अजितदादांची टगेगिरी बीड जिल्हा सहन करणार नाही ; लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी**

आज दि.१९ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधीक्षक कार्यालय आणि शिवाजीनगर पोलिस स्टेशन यांना देऊन त्यांची आवक जावक घेतलेली आहे. तशा दैनिकात बातम्या १७,१८ तारखेला प्रसिद्ध झाल्या आहेत. आंदोलनकर्ते यांनी आक्षेपार्ह घोषणाबाजी केली नाही तसेच काळे झेंडे दाखवले नाही , अजितदादांची गाडी अडवली नाही. केवळ ५ आंदोलनकर्ते लोकशाही मार्गाने आंदोलन करत होते. माझ्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात येणार होते परंतु शुक्रवार पासुन ४ दिवस मी डॉ.आनिल बारकुल यांच्या दवाखान्यात आयसीयु मध्ये अडमिट आहे. मला दररोज रक्त चढवावे लागत असल्याने चक्कर येऊ शकते म्हणून आंदोलनास जाण्यासाठी परवानगी दिली नाही म्हणून मी आंदोलनात सहभागी नव्हतो. परंतु लोकशाही मार्गाने आंदोलन करणारांची पोलिस प्रशासनाकडून मुस्कटदाबी आणि अजितदादांची टगेगिरी बीड जिल्हा सहन करणार नाही अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे लिंबागणेकर यांनी दिली आहे.



## प्रा.डॉ.शाहिस्ता इनामदार यांची प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार : ॲड.आदर्श अरुणराव जाधव

बीड । प्रतिनीधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयाच्या पूर्णवेळ प्राचार्यपदी प्रा.डॉ.शाहिस्ता सलीमखान इनामदार यांची नियुक्ती झाली. त्या महाविद्यालयाच्या पहिल्या महिला प्राचार्य ठरल्या. त्यांनी दि.१७/०५/२०२५ रोजी पदभार स्वीकारला. डॉ. इनामदार यांनी यापूर्वी नवजीवन विधी महाविद्यालय, नाशिक येथे दोन वर्षे प्रभारी प्राचार्य म्हणून काम पाहिले. पंधरा वर्षे त्यांनी सहयोगी प्राध्यापक म्हणूनही काम केले. 'फॅमिली लॉ' या विषयात त्यांनी पीएच.डी केली आहे. त्या पीएच.डी गाईड आहेत. या नियुक्तीबद्दल मा. ड.आदर्श अरुणराव जाधव राज्य सचिव (लीगल सेल) महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना, ड.सुमित पांडे, ड.दिनेश जाधव, प्रा.हराळे सर, गणेश जोगदंड, प्रा.नवनाथ सर व इतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## गेवराई - तलवाडा रस्त्यावर कार-मोटारसायकल

# अपघातात तरूणाचा जागीच मृत्यू

तलवाडा । प्रतिनिधी

रा.मा.क्रमांक ५० या रस्त्यावर तलवाडा गावापासून जवळच असलेल्या ड.सुरेश हात्ते यांच्या त्वरित पेट्रोल पंपानजिक इर्टिका कार व मोटारसायकल अपघातात मोटारसायकलस्वार जगदीश नवनाथ आतकरे (वय वर्षे २०) या तरूणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी चार वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

अपघातात मृत्यू झालेल्या तरूणाचे शवविच्छेदन तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात करण्यात आले असून रात्री नऊ वाजता शोकाकुल वातावरणात स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिसांनी इर्टिका कार ताब्यात घेतली आहे. ओव्होरटेक करण्याच्या नादात मोटारसायकल व इर्टिका कारची समोरासमोर धडक झाल्याचे बोलले जात आहे. हा अपघात इतका भयानक होता की या अपघातात मोटारसायकलस्वाराचा जागीच



मृत्यू झाला असे काही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. याच रस्त्यावर किनगाव नजिक रविवारी दोन मोटारसायकलची समोरासमोर जोरदार धडक होऊन या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या रस्त्यावर आतापर्यंत अनेक जणांचा अपघातात मृत्यू झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. सोमवारी अपघातात मृत्यू झालेला तरूण हा सामाजिक कार्यकर्ते ठकाराम सुरासे यांच्या पुतणीचा मुलगा आहे. या दुर्दैवी घटनेमुळे आतकरे व सुरासे परिवारावर अक्षरशः दु:खाचा डोंगर कोसळला असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

सद्या तलवडा गावात आई त्वरित देवी ची महिना भर चालणारी यात्रा असून भाविक भक्त महाराष्ट्रातून दर्शनासाठी येत असेल याच रस्त्यावर देवीचा नवस फेडण्यासाठी कदुरी च कार्यक्रम होत असून या रस्त्या वर नेहमी वर्दळ असते त्या मुळे असे अपघात वाढत असुन अनेकांचा बळी गेला आहे त्या मुळे अशा ठिकाणी गती रोधक बसवण्या ची मागणी होत आहे.

## शेतकरी जनहित कामगार मंचच्या वतीने वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना विविध मागण्या संदर्भात निवेदन सादर

धारूर । प्रतिनिधी

शेतकरी जनहित कामगार मंचच्या वतीने किल्ले धारूर येथील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने मौजे गोपाळपूर ता. धारूर येथील सर्वे नं. ५१६ व ५२२ मधील सी.सी.टी.च्या कामामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी. वनपरिक्षेत्रातील अवैध वृक्ष तोडीस मदत करणारे वनमजूर श्री. वचिष्ठ भालेराव यांच्यावर तत्काळ कार्यवाही करण्यात यावी. धारूर परिक्षेत्रातील आरा मशीन मध्ये अवैध लाकडांचा साठा असुन त्यांना सहकार्य करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कार्यवाही यावी. अशा काही प्रमुख मागण्यासह 'शेतकरी जनहित कामगार मंचच्या' वतीने वनपरिक्षेत्र कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले.

वनपरिक्षेत्र कार्यालय धारूर अंतर्गत मौजे गोपाळपूर ता.धारूर येथे सर्वे नं. ५१६ व ५२२ मध्ये सी.सी.टी.ची कामे झालेले असुन सदरील कामामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. सदरील कामे ही इस्टीमेट डावलून मनमानी पध्दतीने गुत्तेदार व अधिकारी यांनी संगनमताने केलेली असुन लाखो रूपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. तरी या कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी व जोपर्यंत काम इस्टीमेटप्रमाणे होत नाही तोपर्यंत सदरील कामाचे देयके अदा करण्यात येऊ नयेत. तसेच वनपरिक्षेत्र परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध वृक्ष तोड सुरू आहे. या वृक्ष तोडीस आपल्या कार्यालयातील वनमजुर श्री. वचिष्ठ भालेराव हे मदत करत असुन त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी. अवैध वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत आहे. एकीकडे झाडे लावा झाडे जगवा मोहिम शासनामार्फत राबविण्यात येत असुन दुसरीकडे संबंधित कार्यालयातीलच वनमजुर श्री. वचिष्ठ भालेराव हे अवैध वृक्ष तोड करणाऱ्यास सहकार्य करत आहेत, अशी माहिती स्थानिक शेतकऱ्यांकडून मिळालेली आहे. त्याकारणावरून वचिष्ठ भालेराव यांची चौकशी करण्यात यावी.



तसेच धारूर वनपरिक्षेत्रातील आरा मशीन चालक यांच्याकडे मोठ्या प्रमाणात लिंबाचे, आंब्याचे झाडांच्या लाकडांचा अवैध साठा आहे, त्यांना आपल्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी सहकार्य करत असुन त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. तरी माननीय वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वरील तिन्ही मुद्देनिहाय पंधरा दिवसाच्या आत चौकशी करण्यात यावी व चौकशी होइपर्यंत कसलेही देयके अदा करण्यात येऊ नयेत तसेच अवैध वृक्ष तोडीस मदत करणारे वनमजुर श्री. वचिष्ठ भालेराव यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. तसेच धारूर परिक्षेत्रातील आरा मशीनमध्ये अवैध लाकडांचा साठा दिसुन येत आहे त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा शेतकरी जनहित कामगार मंचच्या वतीने विभागीय वन अधिकारी कार्यालय बीड येथे दि. २६/०५/२०२५ रोजी आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आलेला आहे.




बीड - गणेश भेटे यास वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना फहीम इनामदार, रविंद्र शिनगारे अध्यक्ष पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्र राज्य सह मित्र परिवार.

## केज शहरात 'राजश्री ॲग्रो एजन्सी' चे दिमाखात उद्घाटन

केज । प्रतिनिधी

अतुल एकनाथराव तांदळे कोरेगांवकर यांचे 'राजश्री ग्रो एजन्सी' वि. दा. कराड अध्यापक विद्यालय समोर, बिड रोड केज येथे दि.१८/०५/२०२५ रोजी उद्घाटन संपन्न झाले. यावेळी ॲड.नाईकवाडे साहेब, सपाटे सर, पत्रकार सचिन साखरे, राहुल तांदळे अशा अनेक मान्यवरांनी या सोहळ्याला उपस्थिती लावून शुभेच्छा दिल्या.



कृषी सेवा केंद्राचा शुभारंभ शेतकऱ्यांच्या हितासाठी करण्यात आला असून सर्व नामांकित कंपन्यांची कृषी निविष्ठा योग्य दरात याठिकाणी ऊपलब्ध होईल अशी माहिती यावेळी बोलतांना अतुल तांदळे यांनी दिली.

पान १ वरून...

### आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल करुन....

स्टेशनकडून बारकाईने लक्ष ठेवले जात असुन एखादी व्यक्ती अशा आक्षेपार्ह पोस्ट करतील किंवा तथा पोस्ट व्हायरल करतील अशा व्यक्तींविरुद्ध तसेच अशा आक्षेपार्ह व्हीडीओ किंवा फोटो व्हायरल करुन त्याची शहानिशा न करता किंवा खात्री न करता त्याला जातीय रंग देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध तसेच अशा आक्षेपार्ह व्हीडीओ, फोटो किंवा पोस्ट व्हायरल करुन एखादा अनुचीत प्रकार घडुन कायदा व सुव्यवस्थेची परीस्थती निर्माण झाल्यास व त्यातुन होणाऱ्या सार्वजनीक व खाजगी मालमत्तेच्या नुकसानास जबाबदार धरुन अशा व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल करुन कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी सांगीतले आहे.

### धारूर शहरात स्वच्छतेचे तीन तेरा

शहरात सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचलेले दिसत आहे तर नाल्याही तुडुंब भरल्याने शहरात रोडला घाण पाणी साचत असून अनेक आजार होण्याचे चित्र ठिकठिकाणी दिसत आहे

मात्र धारूर नगरपरिषद प्रशासन अजूनही झोपेतच आहे शहरात दुर्गंधी पसरली तरीही स्वच्छता करण्याची नाव ही दिसत नाही या सर्व प्रकाराकडे मुख्याधिकारी यांचे दुर्लक्ष असल्याचं शहरातील नागरिक बोलत आहे.

### आष्टी तालुक्यात सख्या चुलत्यानेच केला पुतणीवर अत्याचार

त्यावरून पिडीतेच्या आईने पिडीता हि १३ वर्षाची अज्ञान बालिका असुन तिचे अज्ञानाचा फायदा घेउन आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला अशा अशयाच्या फिर्यादी दिली. त्यावरून प्रस्तुत प्रकरणातील आरोपी विरूद्ध तोफखाना पो. स्टे अहिल्यानगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला व सदर गुन्हा हा अंभोरा पो.स्टे ता. आष्टी जि. बीड च्या कार्यक्षेत्रात येत असल्याने सदरील गुन्हा पो.स्टे अंभोरा ता. आष्टी यांच्याकडे तपासासाठी वर्ग करण्यात आला. सदर तपासादरम्यान फिर्यादी व इतर साक्षीदार व वैद्यकीय पुरावा यावरून प्रस्तुत प्रकरणातील अरोपी विरूद्ध सबळ पुरावा आढळल्याने विशेष सत्र न्यायालय बीड येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. प्रस्तुत प्रकरणाचा तपास सुरवातीला ए.पी.आय श्री बी.सी. गोसावी, ए.पी.आय श्री डी.बी कोळेकर व त्यांनतर श्रीमती सुरेखा.एस.धस, म.स.पो.नि. अ.मा.वा.प्र. कक्ष यांनी केला. सदर प्रकरणात आरोपी विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्याकामी पिडीता, फिर्यादी, डॉक्टर, न्यायवैद्यकीय प्रयोगशाळा येथील तज्ञ व इतर एकुण १८ साक्षीदार तपाण्यात आले. सदर प्रकरणात पिडीतेचा पुरावा त्याचबरोबर पिडीतेबाबतचा वैद्यकीय पुरावा व प्रकरणातील डी.एन.ए तपासणी अहवाल व इतर साक्षीदार यांचा पुरावा व सहा. सरकारी वकिल अनिल बी. तिडके यांचा युक्तीवाद ग्राहय धरुन मा. एस. आर पाटील मॅडम अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश १ बीड यांनी प्रस्तुत प्रकरणातील आरोपीस कलम ३७६ (२) (ष), ३७६ (२) (प), ३७६ (३) भादवी व कलम ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये दोषी ठरवुन कलम ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये आरोपीच्या नैसर्गिक मृत्युपर्यंत आजन्म कारावास व २५,०००/- रूपये दंड तसेच कलम ५०६ भादवी अन्वये ६ महिने साधा कारावास व ५००/- दंड व दंड न भरल्यास १५ दिवसांचा साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणात सहा. सरकारी वकिल अनिल बी. तिडके व ॲड. अजय दि. राख जिल्हा सरकारी वकिल, बीड यांनी काम पाहिले. त्यांना पैरवी अधिकारी पोलिस हवालदार ११४ बी बी. शिंदे तसेच अंभोरा पोलिस स्टेशनच्या महिला पोलिस कर्मचारी एस. आर जेव्हे यांनी सहकार्य केले.

## समाज भूषण सिरसाळा येथील बुद्ध विहारास डॉ. सिद्धार्थ हात्तीअंबीरे याची धावती भेट

सिरसाळा । प्रतिनिधी

आज रोजी सिरसाळ्या मध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष मा.डॉ.सिध्दार्थ (भाऊ) हत्तीअंबीरे. यांनी सदिच्छा भेट दिली असता तेथील जयंती उत्सव समिती व बौद्ध उपासक यांनी पंचशील स्कार्फ, पुष्पहार व मानाचा फेटा बांधून स्वागत व सत्कार केला... उपासकांच्या सोबत मा.डॉ.सिध्दार्थ भाऊ हे कायम आहेत व आपल्याला लागेल तिथे मदत करण्याची तयारी आहे असे आश्वासन याप्रसंगी त्यांनी दिले...त्यांनी तेथील होत असलेल्या नूतन बुद्ध विहाराची पाहणी देखील केली..अतिशय उत्कृष्ट काम चालू आहे... या सर्व स्वाभिमानी बांधवांचा मनस्वी अभिमान वाटला... याप्रसंगी त्यांच्यासह पिआरपी.चे मराठवाडा प्रदेशअध्यक्ष.व ज्येष्ठ नेते आयु.गौतमजी मुंडे सर,आयु.डॉ.सुनील तुरूकमाने,आयु.मिलिंद घोसळे.व तसेच सिरसाळा येथील ज्येष्ठ नेते राम किरवले,व सेवानिवृत्त



पीएसआयु.सुभाष चोपडे. सर व जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी उपस्थित होते.

सिरसाळा व परिसरातील सर्व बौद्ध उपासक/उपासिका यांना कळविण्यात येते की परभणी येथील बौद्ध उपासक मा.डॉ.सिद्धार्थजी हत्तीअंबीरे हे सिरसाळा येथील बौद्ध विहारात उपस्थित राहणार आहेत. व तथागत गौतम बुद्ध यांच्या थायलंड येथील अस्थी घेऊन ते परभणी या ठिकाणी आणल्या व परभणी ते मुंबई ५००.किलोमीटर आंतरराष्ट्रीय ११०.भतेजी घेऊन पदयात्रा काढण्यात आली आसुन तसेच परभणी तालुक्यातील मौजे मांडाखळी यथे स्वखर्चाने १०.एकर जमीन खरेदी करून त्या जागी ५०.फुट उंचिचा धम्म ध्वज उभारला आहे. लवकरच या जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे गोल्डन बुद्ध टेंपल उभारण्यात येणार आहे. आसे धम्म चळवळ गतिमान करणयासाठी प्रयत्न करीत आसलेले मा.डॉ.सिद्धार्थजी हत्ती अंबीरे साहेब हे आपल्या बुद्ध विहारास शुभेच्छा भेट दिली आहे.

या वेळी उपस्थित सिरसाळ्यातील भिम सैनिक उपस्थित होता. सिरसाळा येथील आंबेडकर जयंती कमिटी यांनी या विहारासाठी आम्हाला कंपाऊंड ची फार मोठी गरज लागणार आहे. या साठी डॉ.सिद्धार्थ हत्तीअंबीरे साहेब यांनी ते आम्हाला बुद्ध विहारासाठी सिरसाळा येथील कुठल्याही फडा मधुन द्यावे आसे आव्हान केले आहे.व त्यानी त्याच्या भाषणातून लागलीच त्यानी सांगितलेली मी २८.मे रोजी कार्यक्रम घेत आहे. त्या दिवशी तुम्ही आंबेडकर जयंती कमिटी सिरसाळा यांनी परभणी येथे येऊन तुम्ही केलेली मागणी मी तुम्हाला शब्द देतो की त्या कार्यक्रमांमध्ये तुम्हाला बौद्ध विहाराच्या कंपाउंड साठी ३०लाक्ष रुपयांचा फंड उपलब्ध करून देतो अश बोलताना त्यांनी सांगितले आहे.

यावेळी उपस्थित सिरसाळा ग्रामपंचायतचे मा.सरपंच राम दादा किरवले. प्रा.दयानंद झुंजुर्डे साहेबराव.किरवले.सुभाष चोपडे.अच्युत किलवले.चोपडे सर.लोकाशाचे पत्रकार मिलिंद चोपडे.सुरेश उजगरे.आमोल भैया किरवले.राज किरवले..आनंद किरवले.ढिगावर उजगरे.किरण गावडे. विलास किरवले.रणजित रोडे शिंदे साहेब जगतकर बापु किरवले व या विहाराची स्वच्छताची जबाबदारी करणारे सगळ्यांचे तात्या व असे बरेच असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# पशुवैद्यकीय दवाखान्याचे बांधकाम करताना राज्यभरासाठी एक समान 'टाईप प्लॅन' तयार करणार

बीड । प्रतिनिधी

नवीन पशुवैद्यकीय दवाखान्याचे बांधकाम करताना यापुढे राज्यभरासाठी एक सारखा असा टाईप प्लॅन तयार करण्यात येणार असल्याचे राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.



उप मुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन विकास समितीची बैठक पार पडली, त्यावेळी ना. पंकजाताई बोलत होत्या. खरीप हंगाम पूर्व आणि जिल्ह्यातील विकास कामांचा आढावा तसेच जिल्ह्यातील महत्वाचे प्रकल्प असलेले प्रस्तावित विमानतळ, अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्ग, कृषी महाविद्यालय परळी, बिंदुसरा स्वच्छता, जिल्हा क्रीडा संकुल, शासकीय इमारती आदी विविध विषयांचा आढावा यावेळी बैठकीत घेण्यात आला.

यावेळी बैठकीत बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या, अनेक ठिकाणी पशुवैद्यकीय महाविद्यालयाला नवीन इमारतींची गरज आहे. यापुढे नवीन पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतींचे बांधकाम करत असताना संपूर्ण राज्यभर एक सारखा असा टाईप प्लॅन तयार करून इमारती बांधल्या जातील.

**बीड, जालन्यात विशेष तरतूद**

बीड व जालना जिल्ह्यात नवीन पशुवैद्यकीय दवाखाना बांधण्याकरिता राज्य स्तरावरून निधीची विशेष तरतूद करण्यात येईल असं ना. पंकजाताई मुंडे यावेळी सांगितलं. परळी येथे होत असलेल्या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रस्तावित कामाचा बैठकीत आढावा घेण्यात आला.

# शरद शेजाळ यांना २०२५ चा राज्यस्तरीय शिक्षक सेवा सन्मान पुरस्कार प्राप्त

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सी.बी.एस.ई ची नामांकित ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल, सोमेश्वर नगर, बार्शी रोड, बीड या शाळेचे मराठी विषय शिक्षक शरद नारायण शेजाळ यांना राज्यस्तरीय शिक्षक सेवा सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या अगोदर विर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार, महाराष्ट्र योद्धा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. शरद नारायण शेजाळ हे सिरसमार्ग ता. गेवराई, जि- बीड चे भूमिपुत्र आहेत. त्यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अतुलनिय आहे. त्यांच्या कार्याशी एकनिष्ठ होऊन जबाबदारीने काम पार पाडतात. कर्तव्यदक्ष, गुणवान, प्रतिभावंत कार्यक्षम व्यक्तिमत्व असणारे शरद शेजाळ यांचे शिक्षण एम.ए., एम.एड आहे. ते मराठी विषयाचे उत्कृष्ट अध्यापनाचे कार्य करतात.



दि.१८ मे २०२५ वार रविवार रोजी सायबर कॉलेज, कोल्हापूर येथे सन २०२५ चा शिक्षक फाउंडेशन द्वारा संचलित महाराष्ट्र शिक्षक पॅनलचा राज्यस्तरीय शिक्षक सेवा सन्मान प्रसिद्ध मराठी सिने अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सदर प्रसंगी सुप्रसिद्ध कवी रोहित शिंगे, महाराष्ट्र शिक्षक पॅनलचे अध्यक्ष दीपक चामे, सचिव सतीश कोळी, महाराष्ट्र शिक्षक पॅनलचे समन्वयक आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर सोहळा अतिशय दिमाखदारपणे संपन्न झाला. प्रथमतः सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांची हलगीच्या तालावर वाजत-गाजत, पुष्पवृष्टी करून मिरवणूक काढण्यात आली. सकाळच्या सत्रात सांगलीच्या 'वाह क्या बात है' ऑर्केस्ट्रा कार्यक्रम झाला. दुपारच्या सत्रात पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा पुरस्कारचा दिमाखदार सोहळा संपन्न झाला. महाराष्ट्रातील १८० जणांना ट्रॉफी, सन्मानपत्र देऊन पुरस्कारीत करण्यात आले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे नियोजन करण्यात आले होते.

# सकळ राजपूत समाजाच्या वतीने विर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या अर्धाकृत पुतळा हलवण्याबाबत पालकमंत्री यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

येथील यशवंत उद्यानातील वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या अर्धपुतळ्याच मुखवटा तोडून विटंबना करण्यात आली व भाला चोरीला गेल्यामुळे नवीन जागी पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत विनंती सोनल पाटील महिला प्रदेश कार्यकारी अध्यक्ष, सोनाली ठाकूर महिला प्रदेश अध्यक्ष वाशीम, राष्ट्रीय राजपूत करणी सेना, प्रणव अभयसिंग बुंदेले व सकळ राजपूत समाज यांच्या वतीने अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री, बीड जिल्हा यांना देण्यात आले.

निवेदनात असे नमुद करण्यात आले की, बीड शहरातील यशवंत उद्यान (चमन) येथे स्थापित असलेला वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांचा अर्धपुतळा सध्या अत्यंत वाईट अवस्थेत आहे. पुतळ्याचा मुखवटा तोडण्यात आलेला असून, त्यावरील भालाही अज्ञात व्यक्तींनी चोरी केला आहे. तसेच, या पवित्र स्थळी असामाजिक तत्वांचे लोक नियमितपणे दारू पिऊन बसतात, त्यामुळे परिसर अशोभनीय आणि महिलांसाठी असुरक्षित बनलेला आहे. महाराणा प्रताप हे राष्ट्रभक्ती, स्वाभिमान व पराक्रमाचे प्रतीक असून, त्यांच्या पुतळ्याची झालेली विटंबना समाजाच्या भावना दुखावणारी आहे.

या पार्श्वभूमीवर, सद्यस्थितीत असलेला अर्धपुतळा सुरक्षितपणे त्या ठिकाणाहून हलवण्यात यावा, जेणेकरून तो अधिक विटंबित होणार नाही. तसेच बीड शहरात योग्य, सुरक्षित व प्रतिष्ठित ठिकाणी वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा. व नव्या ठिकाणी पुतळ्याच्या सुरक्षा, स्वच्छता व देखभालीची पुरेशी व्यवस्था करण्यात यावी. आपण समाजाच्या भावना लक्षात घेऊन या निवेदनाची गंभीर दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी अशी विनंती करण्यात आली.





# जन्म देवाने दिला पण आपण कसे वागायचे हे आपण ठरवायचे : सुधाकर महाराज वाघ

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील घाटा पिंपरी येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताहची सुरुवात झाली असून रोज महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार यांचे कीर्तन या ठिकाणी होत आहे त्यातच दुसरा दिवस दुसरी किर्तन रुपये पुष्प ग गुंफताना ह भ प सुधाकर महाराज वाघ म्हणाले की संत देवा पेक्षा मोठे आहेत जन्मदेवाने दिला पण आपण कसे वागायचे हे आपण ठरवायचे आपण कोणाचीही निंदा नालस्ता करू नये आपण जर दुसऱ्याकडे दोन बोटे केले तर आपल्याकडे बोट नक्की होते देवाची सेवा करताना निस्वार्थपणे केले पाहिजे असं संतांनी सांगितलेले आहे त्यामुळे आपल्या जीवनामध्ये आपण जेवढे पुण्य कर्म करता येईल तेवढे करावे असे ते यावेळी म्हणाले एवढी संत तुकाराम महाराजांचा अभंग घेताना संत समागम एखाद्या परी राहावे त्यांच्याद्वारे श्वान यांनी तुका म्हणे सर्व सुख त्या संगती घडील पंगती संताची याबाबत त्यांनी उपस्थित भाविक भक्तांना मार्गदर्शन करत आपली कीर्तन रुपी सेवा केली केली. यावेळी घाटा पिंपरी देवळाली धामणगाव लोखंडवाडी दादेगाव परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते मंदिर परिसरात पूर्ण विद्युत रोशनी केल्याने रात्रीच्या वेळी मन प्रसन्न करणारे वातावरण परिसरात तयार झाले आहे.



# डॉ. स्वरूपसिंह हजारी यांनी आगे कुटुंबाला आर्थिक मदत करून घेतली सांत्वन भेट



धारूर । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील किट्टीअडगाव येथील भारतीय जनता पार्टीचे युवा कार्यकर्ते बाबासाहेब आगे हे सामाजिक राजकीय क्षेत्रामध्ये अग्रेसर होते ते सतत नागरिकांच्या मदतीला धावून जात होते. अशा कर्तृत्वान बाबासाहेब आगे यांची मागील महिन्यामध्ये हत्या झाली होती. त्यांच्या कुटुंबाला भेट देण्यासाठी धारूर येथील भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगराध्यक्ष डॉ स्वरूप सिंह हजारी यांनी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकाऱ्यांसह किट्टीआडगाव येथे जाऊन कुटुंबाची सांत्वन भेट घेतली.

यावेळी डॉ स्वरूप सिंह हजारी यांनी कै बाबासाहेब आगे यांची मुलगी मोक्षदा हिच्या नावाने ७५ हजार रुपयाची एफडी करून कागदपत्रे बाबासाहेब यांच्या वडीलाकडे देण्यात आली. तसेच आगे कुटुंबाला जेव्हा केव्हा मदतीची गरज लागेल त्यावेळेस आम्हीं मदत करण्यास सक्षम राहू असे आश्वासनही त्यांच्या वडिलांना दिले व सांत्वन भेट घेतली. यावेळी संदीप काचगुंडे, ॲड मोहन भोसले, रोहनसिंह हजारी, रूपेश चिद्रवार, सुरेश लोकरे, रामप्रभू मुंडे, अनुभव शेंडगे उपस्थित होते.

# २० मे रोजी जगभरात जागतिक मधमाशी दिन साजरा केला जातो : बाजीराव ढाकणे

बीड । प्रतिनिधी

मधमाशी हा अन्यनसाधारण कीटक आपल्या जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे. निसर्गाच्या अन्नसाखळीतील हा पहिला घटक आहे जो फुलांचे रूपांतर फळात करतो आणि शेतीपिक उत्पन्नात भरघोस वाढ करतो. आपल्या पृथ्वीवरील निसर्ग संतुलीत ठेवण्यास मोठी मदत मधमाशीमुळे होते. आज मधमाशी ची निसर्गातील संख्या घटली आहे त्यामुळे मधमाशी नसल्याचे अनेक तोटे दिसून येत आहेत. निसर्गातील झाडांना फळधारणा कमी लागत आहे. शेतीपिक उत्पादनात कमालीची घट दिसून येत आहे. अनेक शेतकऱ्यांना कृषी महाविद्यालये मधमाशी पालन केले तर फळधारणा होईल असे सल्ले देत आहेत म्हणून आज जगातील मधमाशा दिनानिमित्त आपण



मधमाशी वाचवायची शपथ घेऊ या असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी केले आहे.

निसर्गाचे संवर्धन आणि जतन करायचे असेल तर मधमाशी जगवली पाहिजे ती वाढवली पाहिजे. जीवसृष्टीचं अद्भुत देणं म्हणजे मधमाशी – ती केवळ मध तयार करत नाही, तर अन्नसाखळी टिकवण्याचं, निसर्गाशी घट्ट विणण्याचं महान कार्य करते. मधमाश्यांचं अस्तित्व म्हणजे परागीकरणाचं मूळ, शेतीचं बळ, आणि पर्यावरणाचं संतुलन. या दिवशी आपण सर्वांनी संकल्प करूयात की, कीटकनाशकांचा संतुलित वापर करू, प्रदूषणमुक्त शेतीला प्रोत्साहन देऊ,आणि या नाजूक पण अत्यंत महत्त्वाच्या जीवांचं संरक्षण करू. निसर्ग रक्षणासाठी मधमाशी वाचवूयात व भविष्यासाठी जीवन जोपासूयात आज जागतिक मधमाशी दिवस आहे.

स्लोव्हेनिया देशातील अंतोन यांझा या जगप्रसिद्ध मधमाशीपालन तज्ज्ञाचा २० मे १७३४ रोजी जन्म झाला. त्यांनी सन १७६६ मध्ये जगातील पहिले मधमाशीपालन केंद्र उभारले होते. तसेच १७७१ मध्ये त्यांनी मधमाशीपालनावरील पहिले पुस्तक प्रकाशित केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने २० मे २०१८ रोजी जागतिक मधमाशी दिवस म्हणून घोषित केला आणि तेव्हापासून हा दिवस दरवर्षी २० मे रोजी साजरा केला जातो. आपणही मधमाशी पालन केले पाहिजे आणि निसर्गातील मधमाशा जगवल्या पाहिजे तरच निसर्गाचा समतोल राखण्यासाठी उपयुक्त ठरेल असे मत बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

# डॉ. पारनेरकर महाराज विद्यालयातील विद्यार्थिनी मैथिली कोळी हीचे सर्वत्र कौतुक



धारूर । प्रतिनिधी

१३ मे रोजी इयत्ता दहावीच्या निकालामध्ये कु. मैथिली (निशा) महादेव कोळी हिने वर्षभर मेहनतीने अभ्यास करून विद्यालयातून प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला, तिला ९३.४० टक्के मिळविले, याबद्दल तिचे वडील व आई अश्विनी महादेव कोळी तसेच कुटुंबातील सर्वांनीच तिचे कौतुक केले.

त्याच बरोबर मांजरसुंबा ग्रामस्थ यांनी देखील तिचे भरभरून कौतुक करून पुढील वाटलाचीस शुभेच्छा दिल्या तर भारतीय आदिवासी कोळी सेना बिड जिल्हा अध्यक्ष मुकुंद कमळे यांनी देखील फोन द्वारे तिला शुभेच्छा दिल्या.

# शंभर टक्के निकालाची न्यु इंग्लिश स्कूलने राखली परंपरा




अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील गुरुवार पेठ भागातील एम आय टी संचलित न्यु इंग्लिश स्कुलचा दहावीचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. चि.रुपेश जाधव (९४.२०) ने शाळेतून सर्वप्रथम येण्याचा मान मिळवला. द्वितीय स्थानी कु.भक्ती साठे (९०.२०), तृतीय कु. श्रुती पटाईत (८९.२०), चतुर्थ स्थानी चि. यासिर कुरेशी (८७,६०) तर पाचव्या स्थानी चि.स्मितेश गायकवाड (७९.६०) असे शाळेतील टॉप फाईव्ह विद्यार्थी राहिले.

या यशाबद्दल एम.आय.टी. संस्थेचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड, कार्यकारी अध्यक्ष प्रा. राहुल कराड, अंबाजोगाई विभागाचे कार्यकारी संचालक राजेश कराड, प्रशासकीय अधिकारी शुभांगीताई कराड, संचालक संगप्पा बनदवार,मुख्याध्यापक महेश भस्मे, इतर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# महाराष्ट्रातून बीडच्या जिव्हाळा बेघर निवारा केंद्राची उत्कृष्ट निवारा केंद्र म्हणून निवड

## शहरातील प्रतिष्ठित मान्यवरांकडून कौतुकाचा वर्षाव –संचालक अभिजीत वैद्य

बीड । प्रतिनिधी

राज्य शासन निर्णयान्वये मा.श्री. उज्वल उके (से.नि.भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय निवारा केंद्राची नियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे. राज्यस्तरीय निवारा सनियंत्रण समितीच्या रयत संस्थेद्वारे निवार्याचे निरीक्षण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार त्रिशरण एनलायनमेंट फाउंडेशन या संस्थेने निवारा केंद्राचे निरीक्षण करून अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये सर्वात उत्कृष्ट पाच निवारा गृहांची निवड केलेली आहे.

त्यामध्ये सावली बेघर निवारा केंद्र, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ग्रेस बेघर निवारा केंद्र बृहन्मुंबई महानगरपालिका, शहरी बेघर निवारा केंद्र अंबरनाथ नगर परिषद, संत गाडगेबाबा बेघर निवारा अकोला, अकोला महानगरपालिका तर मराठवाड्यातील एकमेव बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्राची महाराष्ट्रातील या पाच बेघर निवारा केंद्रा सोबत निवड झाली आहे. बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या कार्याची दखल शासनाच्या समितीने घेऊन शहराचा सन्मान वाढवल्याची भावना व्यक्त होत आहे.




मराठवाड्यातील एकमेव बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्राची निवड झाल्याबद्दल तत्कालीन नगराध्यक्ष डॉ.भारतभुषण क्षीरसागर जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे कौतुक करताना म्हणाले की शहरासह जिल्ह्यातील बेघर अनाथांना हक्काचा निवारा मिळावा म्हणून माजीमंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या प्रयत्नातून साकारलेल्या जिव्हाळा बेघर निवारा केंद्राची उभारणी शहरातील मध्यवर्ती भागात करण्यात आली. जिव्हाळा निवारा केंद्राचे कार्य वाढत असून राज्यातील पाच निवारा गृहात बीडचे नाव आल्याने मनाला समाधान होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

बीड नगर पालिकेच्या मुख्याधिकारी श्रीमती निता अंधारे यांनी जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या माध्यमातून आरोग्य, स्वच्छता, स्वावलंबन, शिस्त आणी सांस्कृतिक ठेवा जोपासत रंजल्या गांजलेल्या समाजातील विविध घटकांची मनोभावे सेवा होत असल्याचे मनोगत व्यक्त करुन जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या व्यवस्थापनाचे कौतुक केले आहे.

मा. राज्यसह नियंत्रण समिती मार्फत महाराष्ट्रामध्ये पाच सर्वोत्कृष्ट बेघर निवारा केंद्र यांची निवड झालेली आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड, बीड, अकोला, अंबरनाथ, बृहन्मुंबई येथील निवारा केंद्रांची निवड झाली. जिव्हाळा केंद्रास अमोल बडगुजर, शहर अभियान व्यवस्थापक, चंद्रकांत तोडकर, शहर अभियान व्यवस्थापक, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, (पोलीस खात्यामध्ये पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असलेले, राष्ट्रपती पुरस्कार विजेते राजूभाऊ गुळभिले यांच्या पुढाकाराने निवारा केंद्रामध्ये शहरातील दानशूर व्यक्तींच्या मदतीने सर्वात मोठा अन्नदानाचा प्रश्न बऱ्याच अंशी मार्गी लागला. यामध्ये गुळभिले सरांचे मोलाचे सहकार्य लाभले असल्याचे प्रतिपादन जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजित वैद्य, व्यवस्थापक राजू वंजारे, यश वंजारे, काळजीवाहक छाया सरोदे यांनी यावेळी सांगितले.

# तुम्ही आ.विजयसिंह पंडित यांना साथ दिली, आता मी विकास रुपी बळ देण्याचं काम करणार : अजित दादा पवार

## गेवराईत १८ कोटी रुपयांच्या विकास कामांचे उद्घाटन आणि पि.टी.आर.चे वाटप
## गेवराई शहराच्या हद्द वाढीसह इतर प्रश्न तात्काळ मार्गी लावणार अजित दादांचे आश्वासन

गेवराई । प्रतिनिधी

राज्यातील जनतेने या महायुतीला भरभरून प्रतिसाद देत महायुतीला कौल दिला. यामध्ये गेवराई विधानसभा मतदार संघातून तुम्ही विजयसिंह पंडित यांना भरघोस मताने निवडून देत खंबीर साथ दिली आसून आता मी सरकार म्हणून त्यांना विविध विकास कामासाठी भरघोस निधी देऊन बळ देण्याचे काम करणार आसल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी केले, तर आ. विजयसिंह पंडित यांनी प्रामुख्याने गेवराई शहराच्या हद्द वाढ व बायपास टू बायपास रस्त्यासाठी विशेष पाठपुरावा केलेला आसून मी जातीने लक्ष घालून हा प्रश्न तात्काळ मार्गी लावणार आसल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी गेवराईकारांना दिले. गेवराई येथे विकास कामांचा शुभारंभ व अतिक्रमण धारकांना हक्काच्या पी.टी.आर.चे वाटप करताना ते बोलत होते.

माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून १८ कोटी रु. किंमतीच्या विविध विकास कामांचा शुभारंभ व अतिक्रमण धारकांना हक्काच्या पी.टी.आर.चे वाटप महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. श्रीमती पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, आ. सतिष चव्हाण, आ. विक्रम काळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे प्रदेशाध्यक्ष, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष स्वप्नील गलधर, माजी आमदार संजय दौंड, राजकिशोर मोदी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी ना. अजितदादा पवार यांच्या हस्ते विकास कामांचे उद्घाटन व अतिक्रमण धारकांना पि. टी. आरचे वाटप करण्यात आले.

यावेळी आपल्या प्रास्ताविकात बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, विधानसभा निवडणुकीच्या विजयानंतर पाच महिने २६ दिवसात निवडणूक प्रचारात दिलेल्या आश्वासनांची पुर्तता करण्याचा प्रयत्न केला. अजितदादा यांच्या मार्गदर्शनाखाली बरीच विकासकामे कामे झाली. शहरातील मतदारांनी शिवछत्र परिवाराच्या बाजूने तीन दशकांनंतर कौल दिला. अजितदादांचा वादा पक्का होता म्हणून भरभरुन आशिर्वाद दिले. आता अपेक्षा वाढल्या आहेत. लोकांच्या अपेक्षा माझ्याकडे आणि माझ्या अपेक्षा तुमच्या दादा तुमच्या कडे आहेत असे सांगून गेवराई बायपास ते बायपास सिमेंट रस्ता गेवराई शहराची हद्दवाढ, अचानकनगर येथील नागरिकांना घरकुल, गेवराई शहर स्वच्छ करण्यासाठी भुमिगत गटार, सिंदफनेचे पुनर्जिवन या व ईतर कामासाठी निधी मंजूर करुन द्यावा अशी मागणी त्यांनी यावेळी केले.

याप्रसंगी बोलताना ना. पंकजा मुंडे म्हणाल्या की, अनेक वर्षे गेवराईची गोर गरिब जनता हक्काच्या पिटीआरची मागणी करत होती ती विजयसिंह पंडित यांनी पुर्ण केली. आ. विजयसिंह लोकांसाठी तळमळीने काम करत आहेत असे सांगून त्यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या कामाचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगर पालिकेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी मानले. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित यांच्यासह सर्व संस्थाचे पदाधिकारी व कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





### महेश दाभाडे आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीत दाखल

कार्यक्रमात गेवराईचे माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी ना. अजितदादा पवार यांनी त्यांचे स्वागत करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महेश दाभाडे यांच्यासह सचिन मोटे, कृष्णा मुळे, मंजूर बागवान, विलास सुतार, विलास थोरात यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. कार्यक्रमात गेवराई येथील साईनाथ सुर्यवंशी, मैनाबाई सानप, सलाउल्ला पठाण, बेबी शेख, सुनिता बनसोडे, संगीता गायकवाड, प्रल्हाद पाळेकर यांच्यासह आकरा नागरिकांना पिटीआरचे प्रातिनिधिक वाटप करण्यात आले.

# वीज बिल न भरणा करणाऱ्या विरुद्ध लाईनमन सुरेश कांडेकर यांच्या पथकाची कडक मोहीम

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा या ठिकाणी वीज चोरी तसेच नियमित वीज भरणा न करण्या विरूद्ध तलवाडा येथील लाईमन सुरेश कांडेकर यांच्या पथक काने कडक मोहीम राबवत कनेक्शन बंद करून विजचोरी करण्या चे धाबे चागलच धनालेले आहेत.



या बाबद सविस्तर माहिती अशी की, गेल्या काही दिवसंपासून तलवाडा या गावात नेहमी ट्रान्सफर्मार नेहमी जळत होते त्या मुळे आर्धे गाव अंधारात असत लोकांची चागलीच विजे आभावी अनेक समस्या सामोरे जावे लागत होते तलवाडा सर्कल येथिल लाईनमन सुरेश कांडेकर यांनी मंगळवार रोजी गावात जे कोणी वीज चोरी करत आहे तसेच जे नियमित वीज भरणा करत नाही अशा लोकांचे कनेक्शन बंद करून ट्रान्सफॉर्मर वर येणारा ताण कमी केला हि मोहीम यशस्वी करण्यासाठी तंत्रज्ञ श्री पाचंनकर, तंत्रज्ञ राजे शिंदे, तंत्रज्ञ गजानन वाघमारे, तंत्रज्ञ सतीश मोरे, यांनी मोठे परिश्रम घेतले.

जेव्हापासून प्रधान तंत्रज्ञ सुरेश खांडेकर यांनी तलवाडा गावचा चार्ज घेतल्यापासून विजेची समस्या दूर झाली असून त्याच्या कामाची पद्धत अतिशय शिस्तबद्ध असून एक कॉल प्रॉब्लेम सॉल असे त्यांच्याबद्दल गावात बोलले जात असून त्यांनी मोहीम राबवत असताना वीज ग्राहक आव्हान केले आहे की, ग्राहकांनी महावितरनास सहकार्य करून आपल्याला नियमित लागणारा वेळ पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी वेळेवर बिल भरणा करावा व कारवाई टाळावी.

# माली पारगाव ग्रामपंचायत भोंगळा कारभार?

माजलगाव । प्रतिनिधी

माली पारगाव ग्रामपंचायत भोंगळा कार्यक्रम चालू आहे माले पारगाव हद्दीतील दुकान हॉटेल यांना चार्जेस आजपर्यंत ही लागलेले नाहीत बऱ्याच वर्षांचा काळ लोटून गेलेला आहे तरीही ग्रामसेवक सरपंच हे का गप्प आहेत. ग्रामसेवक सरपंच यांनी गाळे काढण्याचे काम सुरळीतपणे करावा हे गावकऱ्यांची विनंती आहे व तसेच ठरवून देण्यात यावे कलम १४,३ च्या अंतर्गत नोटीस बजविण्यात यावा ग्रामपंचायत सदस्य व इतर कर्मचारी यांनीच सर्व जागा मताळून बसलेली आहेत. सर्व सामान्य माणसाला जागा धरण्यास टाळाटाळ करत आहेत. ग्रामसेवक सरपंच उपसरपंच यांना कळकळीची विनंती की अभिप्रायल घ्यायला लावू नका ग्रामस्थ सतीश खंडागळे माली पारगाव.

# आ.सुरेश धस यांच्या पुढाकाराने शहादेव नरवडे यांच्यावर मुंबई येथे शस्त्रक्रिया !

## ६ लक्ष रुपयांपर्यंतची मोफत शस्त्रक्रिया; नरवडे कुटुंबियांनी मानले आ.धसांचे आभार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी मतदारसंघाचे लोकनेते आमदार सुरेश धस यांची मतदार संघामध्ये निरंतर रुग्णसेवा सुरू असून त्यांनी आत्तापर्यंत शिक्षण, आरोग्य, महिलांचे प्रश्न अशा विविध प्रश्नांवर त्यांनी चांगले काम केलं आहे. ते सातत्याने नाविन्यपूर्ण काम करण्यात अग्रेसर असतात. असेच त्यांच्याकडे आरोग्याचा विषय घेऊन जाणाऱ्या व्यक्तीला ते नेहमी सहकार्यची भावना मनात ठेवत मदतीचा हात दिला आहे.

आष्टी तालुक्यातील बीडसांगवी येथील शहादेव नरवडे यांची गेल्या अनेक दिवसांपासून गुडघ्याचा जॉईंटाचा त्रास होत असल्याकारणाने त्यांनी दोन ते तीन वेळा मुंबई व पुणे येथे ऑपरेशन केले परंतु त्यावरही त्यांचा त्रास कमी झाला नाही. त्यानंतर त्यांना डॉक्टरांनी ऑपरेशन करण्याचा सल्ला दिल्याने या ऑपरेशनसाठी पाच ते सहा लक्ष इतका खर्च खाजगी रुग्णालयांमध्ये येत होता तेव्हा त्यांनी आ.सुरेश धस यांची भेट घेत आपल्या वेदना सांगताच तात्काळ आमदार सुरेश धस यांनी या रुग्णाची मदत करण्याच्या हेतूने मुंबई येथील नामांकित हॉस्पिटलमध्ये विविध ट्रस्ट व मुख्यमंत्री सहायता निधीसह धर्मादाय यांच्याशी संपर्क करत विविध माध्यमातून मोफत शास्त्रक्रिया यशस्वीपणे केली.



आ.सुरेश धस हे रुग्णांचा ईलाज करण्यासाठी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्णसेवा देण्यासाठी नेहमी तत्पर असतात, ज्या गरिबांजवळ असाध्य रोगांवर उपचार करवून घेण्यासाठी पैसा नाही, ज्यांना मरणाशिवाय पर्याय नाही अशा रुग्णांना मदतीचा हात देण्याची भावना मनात असल्याने मतदार संघातील ग्रामीण भागांत राहणाऱ्या गरीब व कोणीही वाली नसलेल्या रुग्णांना स्वास्थ्य सुविधा पुरवविण्याचे काम करीत आहे.

याच हुतात भावनेने शहादेव नरवडे यांना ६ लाख रुपयांची मोफत शस्त्रक्रिया मुंबई येथील रुग्णालयात आ.सुरेश धस यांच्या माध्यमातून यशस्वी करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर नरोडे हे ठणठणीत बरे झाले असून आमदार सुरेश धस यांच्या या जागरूक पणामुळे फार मोठा आरोग्याचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे नरवडे परिवाराने आभार मानले.

# फौजदार सुर्यकांत गुळविलेनी दिला एक महिन्याचा पगार पंतप्रधान रिलीफ फंडासाठी

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त पोलीस उपनिरीक्षक सूर्यकांत गुळभीले आणि त्यांच्या पत्नी नीता गुळभीले या दोघा पती पत्नीने आपला एक महिन्याचा पगार पंतप्रधान रिलीफ फंडासाठी देत एक आदर्श निर्माण केला आहे. ऑपरेशन सिंदूर च्या माध्यमातून प्रेरणा घेत पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या मार्गदर्शनाखाली गुळभीले दांपत्याने हा निर्णय घेतल्याने त्यांचे कौतुक होतं आहे.

मागील आठवड्यात भारत पाकिस्तान यांच्या दरम्यान झालेल्या युद्धात भारताने ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानला पळता भुई थोडी केली. यानंतर सिने अभिनेता अक्षय कुमार याने भारतीय जनतेने देशसेवेप्रति प्रत्येक नागरिकांने एक रुपया पी एम रिलीफ फंडासाठी देण्याचे आवाहनत केले होते. गेल्या अनेक वर्षांपासून पोलीस सेवेत असताना पोलीस उपनिरीक्षक सूर्यकांत गुळभीले यांनी जिव्हाळा बेघर असो कि जाणीव प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून गोर गरिबांची सेवा केलेली आहे. एड्स ग्रस्ताचे विवाह लाववण्यासारखे सामाजिक उपक्रम देखील त्यांनी राबवले आहेत.

दरम्यान ऑपरेशन सिंदूर च्या यशानंतर बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी देशसेवा काय असते याबाबत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले होते. त्यानुसार प्रेरित होऊन सूर्यकांत गुळभीले आणि त्यांच्या पत्नी जिल्हा परिषद शिक्षिका नीता गुळभीले या दांपत्याने आपला एका महिन्याचा पगार पी एम रिलीफ फंडासाठी दिला आहे. गुळभीले दांपत्याने जो निर्णय घेतला आहे त्याचा आदर्श इतर कर्मचाऱ्यांनी घेतल्यास देशसेवेचे एक नवे रूप पहायला मिळेल. गुळभीले यांच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून अभिनंदन होतं आहे.



फौजदार सूर्यकांत गुळभिले हे राजाभाऊ नावाने बीड जिल्ह्यातील सामाजिक कार्यक्षेत्रामध्ये आवर्जून सर्वांच्या सुखदुःखामध्ये धावून जाणारे एक पोलीस कर्मचारी आहेत ते बीड जिल्हा रुग्णालयातील किंवा इतर बीड शहरांमध्ये येणाऱ्या गोरगरीब जनतेच्या पोटाची म्हणजे अर्थातच जेवणाच्या डब्याची व्यवस्था करतात. यावेळी त्यांनी अनेकदा गोरगरीब जनतेला जे की रस्त्यावर भीक मागून जगणारे लोक आहेत अशा लोकांना थंडीच्या कडाक्यातून वाचविण्यासाठी स्वेटर ब्लँकेट अंगावरील नवीन कपडे ड्रेस साडी लहान मुलांना खाऊ देत त्यांनी प्रत्येकी वेळी माणुसकीचे दर्शन घडून आणलेले आहे राजाभाऊ गुळ भिले हे पोलीस खात्यामध्ये नोकरीला जरी असले तरी ते आज सुद्धा सर्वसामान्यांचा आधार बनत आहेत.

# अंशतः अनुदानित शाळा टप्पा वाढीची अंमलबजावणी पावसाळी अधिवेशनात : उपमुख्यमंत्री अजित पवार

## बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीचे अजित पवार यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

१४ ऑक्टोबर २०२४ च्या विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांच्या टप्पा वाढीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करून येत्या पावसाळी अधिवेशनात भरीव आर्थिक निधीची तरतूद करून आमचा प्रलंबित असणारा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजित पवार यांनी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या शिष्टमंडळाला दिले.



राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित पवार हे काल दि.१९ मे रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने राज्याचे अर्थमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या मध्ये प्रामुख्याने राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेध्याशानुसार वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आवश्यक निधीची तरतूद करावी अशी मागणी करण्यात आली.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील सर्व विनाअनुदान आणि अंशतः अनुदानित शाळांच्या टप्पा वाढीचा निर्णय आपणच घेतला आहे. काही कारणास्तव निधी उपलब्ध झालेला नाही; परंतु येत्या पावसाळी अधिवेशनात राज्यातील सर्व विनाअनुदानित शाळासह अंशतः अनुदानित शाळांच्या वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या भरीव अशा आर्थिक निधीची तरतूद करून वाढीव टप्प्याचे अनुदान मंजूर करून तुमचा प्रलंबित राहिलेला प्रश्न मार्गी लावणार असल्याचे ना. अजित पवार यांनी या वेळी सांगितले. त्यामुळे येत्या पावसाळी अधिवेशनात वाढीव टप्प्याच्या निधीची तरतूद होऊन खूप दिवसांपासून टप्पा वाढीचा असलेला हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याचे संकेतच अजित पवार यांनी दिल्याने विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यात चैतन्याचे वातावरण तयार झाले आहे.

ना. अजित पवार यांना निवेदन देताना महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष श्री. जितेंद्र डोंगरे सर, बीड जिल्हाध्यक्ष श्री.आत्माराम वाव्हळ सर, श्री.शिवप्रसाद शिरसाट सर, श्री. संजय देवा कुलकर्णी आदी बहुसंख्येने शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT